रविवार, दि. २७ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २६३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्याची तहान दिवाळीदरम्यान भागणार

### एक दिवसा आड पाणी देण्याचा व्यक्त केला आशावाद; आ खोतकर यांनी केली जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी









**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरासाठी नवीन ३५ एमएलडी क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प यंदा दिवाळीपर्यंत कार्यान्वित होणार असून दिवाळीच्या दरम्यान जालनेकरांची तहान भागणार असल्याचे आ. अर्जुनराव खोतकर यांनी म्हटले आहे. जालना शहराला एक दिवस आड पाणी देण्याचे वचन निवडणुकीपुर्वी दिले होते ते लवकरच पूर्ण होऊन जालनेकरांना एक दिवसाआड पाणी मिळणार असल्याचा आशावाद यावेळी त्यांनी व्यक्त केला. आ. अर्जुनराव खोतकर यांनी अंबड येथील नवीन ३५ एमएलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरणाची शनिवार (दि २६) रोजी पाहणी केली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी माहिती दिली. यावेळी मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांची प्रम ुख उपस्थिती होती.

आ. खोतकर म्हणाले की, राज्यात आणि राज्याबाहेर जालनाच्या पाणी टंचाई हा चर्चेचा विषय होत होता. महिना महिनाभर पाणी येत नव्हते, त्यामुळे हा प्रश्न कायम स्वरुमी दूर करण्यासाठी गेली अनेक वर्षांपासून आपण सातत्याने प्रयत्नशिल आहोत. जायकवाडी जालना पाणी पुरवठा ही मा. न्यायालयात जावून आपण ती मंजूर करून घेतली. पुर्वी म्हणजेच १९३२ मध्ये जालनेकरांना घाणेवाडी जलाशयतून पाणी पुरवठा होत असे, या जलाशयातून ९ दशलक्ष लि पाणी मिळत होते त्या वेळच्या लोकसंख्येप्रमाणे हे पाणी पुरेसे होते. जस जशी शहराची लोकसंख्या वाढत गेली तशी १९७० ला अतिरिक्त योजना तयार केली गेली त्यातून ६ दशलक्ष लिटर पाणी शहराला मिळाले. कालातंराने १९८० ला शहागड बंधारा बांधला. या योजनेतून शहराला पाणी मिळत होते. मात्र, त्यातूनही जालनेकरांची तहान भागत नव्हती. या योजनेतून केवळ ५० टक्केच पाणी शहरापर्यंत पोहचत होते. बंधाऱ्यात पाणी सोडावे लागत होते. मध्यंतरी केंद्राने एक योजना आणली होती. त्यावेळी भास्कर अंबेकर नगराध्यक्ष होते. नगर पालिकेने प्रस्ताव केंद्राकडे पाठविला होता. हा प्रस्ताव केंद्राने फेटाळला. त्यानंतर मा. न्यायालयात धाव आपण घेतली. व मा. न्यायालयाचे आदेशाने हा प्रस्ताव मंजूर करून घेतला. ५५ एमलएलडी पाणी आज जालन्याला मिळते. १५ एमएलडीचा फिल्टरबेड अंबड येथे आहे तर २० एमएलडीचा फिल्टरबेड जालना येथे आहे. अशावेळी ३५ एम एलडी पाण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्राचे अंबड येथे काम सुरु होते आजघडीला ८० टक्के काम पुर्ण झाले असून येत्या दिवाळीपर्यंत १०० टक्के काम पूर्ण होईल असा आशावाद आ. खोतकर यांनी व्यक्त केला.

निवडून आल्यानंतर पहिल्या दिवसापासून जालनेकरांच्या पाणी प्रश्नावर काम केले. दिवाळी दरम्यान जालनेकरांना एक दिवसाआड पाणी देण्याचे वचन पाळण्याचा पूरेपुर प्रयत्न आपण करत आहोत.

शहराची लोकसंख्या वाढत आहे. या दृष्टीने शहरात काही जलकुंभांची संख्या वाढवलेली आहेत. या पाइपलाइन योजनेतून अंबड शहराला किती पाणी देण्यात येणार, हे जुन्या ठरावानुसार ठरविले जाणार असल्याचे सांगण्यात आले. शहरातील जीर्ण झालेल्या पाईपलाईन देखील बदलण्यात येणार असल्याचे सांगतांनाच शहराला एक दिवस आड पाणी देण्यासाठी जे जे शक्य आहे ते ते करणार असल्याचे आ. खोतकर यांनी या प्रसंगी ठासून सांगितले.



### आ. खोतकरांकडून आयुक्त खांडेकर यांचे कौतूक


जालनेकरांच्या पाणी प्रश्नासाठी आपण निवडून आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी आयुक्त संतोष खांडेकर यांच्यासमवेत मनपात बैठक घेतली होती. या बैठकीनंतर आयुक्त खांडेकर यांनी शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी दररोज पाठपुरावा सुरु ठेवला त्यांच्या मेहनतीमुळे जालनेकरांना लवकरच एक दिवसाआड पाणी मिळणार असल्याचे सांगत आयुक्त खांडेकर यांच्या कामाचे कौतूक केले.

### सध्याच्या पाणी टंचाईवर पक्ष पातळीवर काम

सध्या शहरात अनेक भागात पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी आहे. पाणी टंचाईच्या विषयावर मनपा प्रशासन हतबल आहे. सध्याची मनपाची आर्थिक स्थिती पाहता त्यांच्याकडून फारशी अपेक्षा नसली तरी राज्य सरकारकडून काही मदत मिळाल्यास ती घेऊ अथवा पक्ष पातळीवर सध्याच्या पाणी टंचाईवर मात करू असा विश्वास आ. खोतकर यांनी यावेळी दिला.

## आ. अर्जुनराव खोतकर व अभिमन्यू खोतकर यांना समाज माध्यमाद्वारे धमकी देणाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी

### शिवसेनेचे पोलीस अधिक्षकांना निवेदन





**जालना । प्रतिनिधी -** राज्याच्या अंदाज समितीचे प्रमुख तथा आमदार अर्जुनराव खोतकर व युवा सेना राज्य सचिव अभिमन्यू खोतकर यांना समाज माध्यमाद्वारे धमकी देणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी शिवसेनेच्या शिष्टमंडळाने प्रभारी पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांचे भेट घेत मागणी केली आहे. पोलीस अधिक्षक कार्यालयात शिवसेनेचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते निवेदन देण्यासाठी शनिवार (दि २६) रोजी जमा झाले होते.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आ. खोतकर व अभिमन्यू खोतकर यांना अज्ञात व्यक्तीकडून समाज माध्यमावर धमकी देण्याची घटना घडली. या प्रकारामुळे पक्षाचे कार्यकर्ते व कुटुंबिय व्यथित झाले आहे. शिवसेना पक्ष हा नेहेमी लोकशाही मार्गाने कार्य करणारा पक्ष आहे. आमचे नेते सातत्याने समाज हितासाठी कार्यरत आहेत. अशा प्रकारची धमकी ही केवळ व्यक्तिगत नव्हे तर लोकशाही व्यवस्थेवरच आघात आहे. आ, खोतकर हे महाराष्ट्र राज्यात सर्वपरिचित आहेत, अशा मोठ्या नेत्यांबद्दल व कुटुंबियांबद्दल असे प्रकार या पुढे घडणार नाही यासाठी धमकी देणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा तात्काळ शोध घेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. घटनेचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. आ. खोतकर आणि अभिमन्यू खोतकर यांना आवश्यक पोलीस संरक्षण देण्यात यावे. नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण होईल अशा उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात अशा मागण्या पान २ वर

## आंबेडकरी चळवळीचे धडाडीचे कार्यकर्ते रिपाईचे जिल्हाध्यक्ष गणेश रत्नपारखे यांचे निधन

**जालना । प्रतिनिधी -** आंबेडकर चळवळीचे धडाडीचे कार्यकर्ते तसेच रिपाई आठवले गटाचे जालना जिल्हाध्यक्ष गणेश पुंजाराम रत्नपारखे यांचे शुक्रवार (दि २५ एप्रिल) रोजी रात्री ८. ३० वाजेच्या सुमारास निधन झाले. मृत्युसमयी ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी त्रिशल्या, महेंद्र गणेश रत्नपारखे व अमोल गणेश रत्नपारखे २ मुले, ३ मुली, २ भाऊ दिलीप रत्नपारखे, सुरेश रत्नपारखे, भावजयी, जावई, सुना-नातवंडे व पुतण्या सुधाकर रतनराव रत्नपारखे असा परिवार आहे. कै. गणेश रत्नपारखे हे माजी नगरसेवक, जालना न.प. पाणीपुरवठा सभापती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानम ालेचे अध्यक्षपद भुषविले होते. त्यांच्यावर २६ एप्रिल रोजी राम



तिर्थ स्मशानभुमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पुज्य धम्मधर भन्तेजी शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र, आ. अर्जुनराव खोतकर, मा. आ. कैलाश गोरंट्याल, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, म ाजी नगराध्यक्ष पार्वताबाई रत्नपारखे, ॲड. शिवाजी आदम ाने, डेव्हीड घुमारे, प्रा सत्संग मुंढे, अण्णासाहेब चितेकर, ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, बाबुराव कदम, पान २ वर

## संपादकीय

# दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याने भारतातच नव्हे जगभर जगभर खळबळ माजली. या हल्ल्याची जशी भारतात निंदा होत आहे तशीच निंदा जगभर होत आहे. संपूर्ण जग या भ्याड हल्ल्याने हादरून गेले आहे. जगाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. भारताने दहशतवाद्यांची कोंडी करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. इतकेच नाही तर या हल्ल्यास ठोस प्रतिउत्तर देण्याची तयारीही भारताने सुरू केली आहे. जर भारताने या हल्ल्यास जशास तसे उत्तर दिले आणि दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवले किंवा सार्जिकल स्ट्राईक केला तर जग भारताच्या बाजूने उभे राहील का ? भारताच्या कारवाईला जगाचा पाठिंबा मिळेल का ? असा प्रश्न विचारला जात आहे जर भारताने दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली तर भारताला जगाचा पाठिंबा निश्चितपणे मिळेल कारण दहशतवादाने फक्त भारतच नाही तर सारे जग पोळून निघाले आहे. केवळ भारतच नाही जगातील सर्वच प्रमुख देशांना दहशतवादाने ग्रासले आहे. सर्व प्रमुख देशांत दहशतवाद्यांनी केंव्हांना केंव्हा हल्ला केला आहे. मागील वर्षीच रशियाच्या मॉस्को शहरात दहशतवाद्यांनी मोठा हल्ला घडवून आणला होता. रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले होते. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली होती. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला होता. रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात अशीच चर्चा जगभर होऊ लागली होती आणि त्याची प्रचिती अवघ्या वर्षभरात आली. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय हद्दीत घुसून भारतीय पर्यटकांना ठार केले. वर्षभराच्या अंतरात जगातील प्रमुख देश असलेल्या या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्यांनी जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोके वर काढत आहे हेच या हल्ल्याने सिद्ध होत आहे अर्थात दहशतवाद्यांनी आताच हल्ले सुरू केले आहेत असे नाही . या आधीही दहशतवाद्यांनी अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत. भारत तर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे. भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्विक समस्या बनली आहे. दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. भारताने दहशतवादाविरोधात कारवाई केली तर संपूर्ण जगाने भारताने पाठिंबा द्यायला हवा. दहशतवादा विरोधातील भारताच्या मोहिमेस जगाने पाठबळ द्यावे. दहशतवादा विरोधात संपूर्ण जगाने एक व्हायला हवे. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्रू आहेत. या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# तिसऱ्या राष्ट्रीय फेंटबॉल अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात

## महाराष्ट्र संघाची विजयाची हॅट्रीक

**जालना । प्रतिनीधी -** फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने व राजस्थान फेंटबॉल असोसिएशन यांच्या वतीने आयोजीत तिसर्या राष्ट्रीय फेंटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२४ -२५ सेंट लॉरेन्स पब्लीक स्कुल, जैतपुरा, जयपुर राजस्थान या ठिकाणी दि. १८ ते २० एप्रिल २०२५ दरम्यान उत्साहात संपन्न झाल्या.

सदर राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातुन सात राज्यांचे जवळपास १५० ते २०० खेळाडु, पंच व तांत्रीक अधिकारी सहभागी झाले होते. स्पर्धेत सातत्यपुर्ण कामगीरी करत महाराष्ट्राचा संघ अजिंक्य राहीला, तर यजमान राजस्थानला दुसर्या स्थानावर समाधान मानावे लागले. पंजाब व उत्तरप्रदेश संघाना कामगीरीच्या आधारावर तिसरे स्थान विभागुन देण्यात आले तर उत्तराखंड संघ चौथ्या स्थानावर राहीला.

स्पर्धेचे उद्घाटन सेंट लॉरेन्स पब्लीक स्कुलचे संचालक डॉ. दिग्वीजय सिंग यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजस्थान फेंटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अनिल कुमार चौधरी हे होते. यावेळी मंचावर फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडिया चे महासचिव शेख चाँद पी.जे., निरीक्षक शेख अहेमद, राजस्थानचे सचिव राजेंद्र योगी, शाळेच्या मुख्याध्यापीका श्रीमती सिंग मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना डॉ. दिग्वीजय सिंग यांनी खेळाडुंना शुभेच्छा देवुन आंतरराष्ट्रीय स्पर्धा जयपुर येथे आयोजीत करण्याची ईच्छा व्यक्त करत फेंटबॉल खेळाच्या विकासासाठी सर्वतोपरी मदत करणार असल्याचे जाहिर केले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष खुशालसिंग राणा ठाकुर यांनी भ्रमणध्वनी वरून उपस्थित सर्व खेळाडु, पंच व तांत्रीक अधिकारी यांना शुभेच्छा दिल्या. तसेच स्पर्धा शिस्तबद्धरीत्या संपन्न करून फेंटबॉल खेळाचे नाव उंचवावे असे निर्देश ही यावेळी दिले.

स्पर्धेत पंच म्हणुन शेख समीर, साहेल खान, सुरेश त्रीभुवन, संतोष वाघ, आर्यन जाधव, गिता वड्डापेल्ली यांना काम पाहीले.



स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडियाचे निरीक्षक शेख अहेमद यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी मंचावर फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडियाचे महासचिव शेख चाँद पी.जे., राजस्थान फेंटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अनिल कुमार चौधरी, सचिव राजेंद्र योगी, ॲड. जी. आर. निठारवाल, मुकेशजी निठारवाल, जगदीश चौधरी यांची उपस्थिती होती. यावेळी सर्व विजेत्या खेळाडुंना मेडल व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, तसेच पंच व तांत्रीक अधिकारी यांना स्मृतीचिन्ह व शिट्ट्या प्रदान करण्यात आल्या.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राजस्थान फेंटबॉल असोसिएशनच्या सर्व पदाधिकारी व खेळाडुंनी अथक परीश्रम घेतले.

स्पर्धेचा अंतीम निकाल पुढिल प्रमाणे :- टिम चॅम्पीयनशिप - चौदा वर्षाआतील मुले - प्रथम राजस्थान, द्वितीय महाराष्ट्र, सतरा वर्षाआतील मुली - प्रथम राजस्थान, द्वितीय महाराष्ट्र, विस वर्षाआतील मुले - प्रथम महाराष्ट्र, द्वितीय - राजस्थान, विस वर्षाआतील मुली - प्रथम महाराष्ट्र, द्वितीय राजस्थान, विस वर्षावरील पुरूष - प्रथम महाराष्ट्र, द्वितीय राजस्थान, तृतीय पंजाब, चतुर्थ उत्तरप्रदेश, विस वर्षावरील महीला - प्रथम महाराष्ट्र, द्वितीय राजस्थान.

वैयक्तीक - चौदा वर्षाआतील मुले - दुहेरी - प्रथम सोमनाथ चव्हाण, रूद्राक्ष एखंडे (महाराष्ट्र), द्वितीय दक्ष सांखला, सावन जाट (राजस्थान), तिहेरी - प्रथम कार्तीक गाडेकर, आदर्श हरबक, रूद्राक्ष एखंडे (महाराष्ट्र), द्वितीय नकुल सोनी, राहुल विर, आयुष जाट (राजस्थान), सतरा वर्षाआतील - मुली - दुहेरी - प्रथम - कोमल चव्हाण, हर्षदा भुतेकर (महाराष्ट्र), द्वितीय दक्षीता सांखला, वर्षा कुमारी नवारीया (राजस्थान), तिहेरी - प्रथम किरण सुळे, साक्षी मुळे, आराध्या हरबक (महाराष्ट्र), द्वितीय नेहा कुमारी, मुस्कान जाट, दिव्या समारिया (राजस्थान), मिश्र दुहेरी - प्रथम - आदर्श हरबक, आराध्या हरबक (महाराष्ट्र), द्वितीय - वर्षा कुमारी, नवाधीश शर्मा (राजस्थान), मिश्र तिहेरी - प्रथम - सोमनाथ चव्हाण, कार्तीक गाडेकर, गौरी शेळके (महाराष्ट्र), द्वितीय - दक्षीता सांखला, जयेश योगी, शिवम योगी (राजस्थान), विस वर्षाआतील - मुली - दुहेरी - प्रथम - जैसीका बत्रा, ज्योती वर्मा (राजस्थान), द्वितीय - शुभांगी पाटेकर, गौरी शेळके (महाराष्ट्र), तिहेरी - प्रथम - सायली एखंडे, साक्षी चव्हाण, शुभांगी पाटेकर (महाराष्ट्र), द्वितीय - इशा सैनी, राघनी कुमारी, हर्षीता वर्मा (राजस्थान), मुले - दुहेरी - प्रथम - अक्षय पवार, अर्जुन शिंदे (महाराष्ट्र), द्वितीय - शिवम सिंग, नकुल सोनी (राजस्थान), तिहेरी - प्रथम - संकेत रोजेकर, शेख साबेर, शेख अहेरार (महाराष्ट्र), द्वितीय - मोहीत कुमार नवारीया, दक्ष सांखला, गगन जाट (राजस्थान), मिश्र - दुहेरी - शेख साबेर, सायली एखंडे (महाराष्ट्र), द्वितीय - ज्योती वर्मा, नकुल सोनी (राजस्थान), मिश्र - तिहेरी - प्रथम - कोमल चव्हाण, किरण सुळे, संस्कार यादव (महाराष्ट्र), द्वितीय - ईशा सैनी, दिनेश यादव, हर्षीता वर्मा (राजस्थान), विस वर्षा वरील महिला - दुहेरी - प्रथम - सायली एखंडे, हर्षदा भुतेकर (महाराष्ट्र), द्वितीय - पलक कुमारी, कल्पना पालीवाल (राजस्थान), तिहेरी - प्रथम - गिता वड्डापेल्ली, कोमल चव्हाण, गौरी शेळके (महाराष्ट्र), द्वितीय - संजु यादव, अर्चना चौधरी, चंदु घोसल्या (राजस्थान), पुरूष - दुहेरी - प्रथम - आर्यन जाधव, अंकीत यादव (महाराष्ट्र), द्वितीय - जयेश योगी, शिवम सिंग (राजस्थान), तिहेरी - प्रथम - संस्कार यादव, श्रावण राठोड, पवन पवार (महाराष्ट्र), द्वितीय - सिद्धार्थ योगी, दिनेश यादव, नवाधीश शर्मा (राजस्थान), मिश्र - दुहेरी - प्रथम - संकेत रोजेकर, हर्षदा भुतेकर (महाराष्ट्र), द्वितीय - पलक कुमारी नवारीया, सिद्धार्थ योगी (राजस्थान), तिहेरी - प्रथम - गिता वड्डापेल्ली, साक्षी चव्हाण, आर्यन जाधव (महाराष्ट्र), द्वितीय - कल्पना पालीवाल, संजु यादव, भानु सोनी (राजस्थान).

### जालन्याच्या मातीतुन निघालेला खेळ तीन वर्षात पोहोचला पाच देशात

जालना शहरातील देवगिरी इंग्लिश स्कुलच्या मैदानावर सूरू झालेला फेंटबॉल हा खेळ खुशाल सिंग राणा ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली व त्यांच्या आर्थीक पाठबळामुळे बघता बघता भारतातील जवळपास १२ राज्ये व पाच देशात सध्या खेळता जात आहे. सलग तिन वर्षापासुन या खेळाच्या राष्ट्रीय स्पर्धा देशाच्या विवीध ठिकाणी आयोजीत करण्यात येत आहेत, यामध्ये पहिली राष्ट्रीय स्पर्धा औरंगाबाद (आजचे छ. संभाजी नगर), दुसरी राष्ट्रीय स्पर्धा बुर्हानपुर मध्य प्रदेश तर तिसरी स्पर्धा जयपुर राजस्थान या ठिकाणी संपन्न झाली आहे. लवकरच नेपाळ येथे आंतरराष्ट्रीय त्रीकोणीय मालीका भारत, बांग्लादेश व नेपाळ यांच्यात खेळवीली जाणार असुन २०२७ मध्ये आठ देशांची आंतरराष्ट्रीय स्पर्धा ही आयोजीत करण्यात येणार आहे. फेंटबॉल खेळाच्या प्रचार व प्रसारामध्ये देवगिरी इंग्लिश स्कुलचे अध्यक्ष तसेच राष्ट्रीय संयोजन समीतीचे अध्यक्ष बबन दादा सोरटी, मुख्याध्यापीका प्रा. गायत्री सोरटी, पुणे जिल्हाध्यक्ष विशाल पवार, सचिव श्रीमती रूपाली पवार, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे पा., राष्ट्रीय निरीक्षक शेख अहेमद, युवा नेते अक्षय पवार, सुरेश त्रीभुवन, विशाल साळवे, प्रविण जाधव, राजकुमार दांडगे, जे.ई.एस. कॉलेजचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. हेमंत वर्मा, तायक्वांडो चे जिल्हा सचिव तथा पोलीस दलात कार्यरत असलेले सचिन आर्य, मुख्याध्यापीका श्रीमती सुनीता गवई, मुख्याध्यापक सुभाष पारे, मुख्याध्यापक गणेश लांडगे, क्रीडा शिक्षक उमेशचंद्र खंदारकर, तुषार गर्जे, मंगेश सोरटी, अमोल सातपुते, सुरेश सावंत, मो. मारूफ खान, अमोल सोलाट तसेच शेख समीर, सोहेल खान, संतोष वाघ, शेख सरताज, वेदांत सोरटी, आर्यन जाधव, नितीन जाधव, शेख मतीन, अमोल काटकर, शेख महेजबीन, गिता वड्डापेल्ली या सर्वांचा सिंहाचा वाटा आहे.

# शिवनेरीची जेष्ठ महिलेस उद्धट वागणुक

**मुंबई -** एकीकडे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटी चांगली चालण्यासाठी महाराष्ट्र सरकार आणि विशेष करून परिवहन मंत्री आणि या महामंडळाचे अध्यक्ष श्री प्रताप सरनाईक हे जीवतोड प्रयत्न करीत आहेत,तसेच ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास,६५ वर्षांवरील ज्येष्ठांना आणि महिलांना अर्ध्या दराची तिकिट सवलत यामुळे एस टी प्रवाशांमध्ये लोकप्रियही होत आहे तर दुसरीकडे एस टी महामंडळाच्या काही कर्मचाऱ्यांच्या मनमानी आणि उद्धट वागणुकीमुळे प्रवासी त्रस्त होत असून संताप व्यक्त करीत आहेत.

नुकताच असाच एक संतापजनक प्रकार नवी मुंबईतील ज्येष्ठ महिला, सामाजिक कार्यकर्त्या सौ अलका भुजबळ यांच्या बाबतीत घडला आहे. पुणे येथील घरगुती कौटुंबिक समारंभ आटोपून त्या शुक्रवारी संध्याकाळी पुणे स्टेशन वर आल्या .शिवनेरी बसचे तिकीट घेतानाच त्यांनी सानपाडा येथे उतरायचे असल्याचे सांगितले होते. ही शिवनेरी बस संध्याकाळी ७.१० वाजता पुणे स्टेशनहून निघाली. बस रात्री अकरा च्या सुमारास जुईनगर येथे आली असताना,वाहन चालकाने मोठ्याने ओरडून जुईनगर येथे कुणाला उतरायचे आहे का? असे विचारले. अर्थात तिथे उतरणारे कुणी प्रवासी नसल्याने बस थांबली नाही. पण त्या दरम्यान बस सानपाड्याजवळ पोहोचू लागल्याने आपल्याला सानपाड्याला उतरायचे आहे,असे सांगून त्यांनी वाहन चालकास बस थांबविण्यास सांगितले. एरव्हीही एस टी आणि खाजगी बस गाड्या या सानपाडा रेल्वे स्थानकासमोर थांबतच असतात. पण या बस चालकाने मध्य रात्रीची वेळ आहे, महिला प्रवासी एकटी आहे आणि त्यात पुन्हा सानपाडा रेल्वे स्थानकासमोर बस थांबत असते,याचा काही एक विचार न करता, सानपाड्याला बस थांबणार नाही.तुम्हाला वाशीलाच उतरावे लागेल असे उद्धटपणे सांगून बेफाट बस रात्री सव्वा अकराच्या सुमारास वाशी फ्लाय ओव्हर च्या खाली थांबवली.इतक्या रात्री तिथे रिक्षा सुद्धा उपलब्ध नव्हती. त्यामुळे श्रीमती भुजबळ यांना तिथून पायी पायी वाशी रेल्वे स्टेशन गाठावे लागले. तिथून एका सज्जन रिक्षा चालकाने त्यांना घरी आणून सोडले.



एकीकडे महिला दिवसेंदिवस असुरक्षित होत असताना केवळ सौजन्य ,व्यावसायिक जबाबदारी म्हणूनच नाही तर त्यांची सुरक्षा लक्षात न घेता , या बस वाहन चालकाच्या बेजबाबदार वागणुकीबद्दल संताप व्यक्त करून एस टी महामंडळाने या कर्मचाऱ्याविरुद्ध कडक कारवाई करावी तसेच एस टी च्या सर्व कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना सौजन्याची वागणूक द्यावी अशी अपेक्षा श्रीमती भुजबळ यांनी व्यक्त केली आहे.

## पान १ वरुन

### आ. अर्जुनराव खोतकर ...

शिवसेनेच्या वतीने करण्यात आले असून या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कारवाई तात्काळ करण्यात येईल अशी आशा निवेदनाच्या शेवटी व्यक्त करण्यात आली आहे.

पोलीस अधिक्षक कार्यालयात शिवसेना संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख ए.जे. पाटील बोराडे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख कालींदा ढगे, चंदाताई शिंदे उज्वलाताई फोपलीया सविताताई किवंडे, विजयाताई चौधरी, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, अमोल राऊत, संतोष मोहिते, गणेश भुतेकर, रमेश शिंदे, भगवान पुराणिक, रामेश्वर भुतेकर, ज्ञानेश्वर सुपारकर, नरसिंग गोरे, रामकिसन कायंदे, उद्धव भुतेकर, विजय हजारी, राधाकिसन दाभाडे, रामेश्वर गाडेकर, संतोष रासवे, बाबासाहेब काटकर, जफर खान, मंदा चौधरी, चंद्रकांत साळे, सगीर, फिरोजलाल तांबोली, ॲड. सुनील किनगावकर, ॲड. भास्कर मगरे, विष्णू वाघमारे, उदय तनपुरे, बाबासाहेब चंद, संजय गायकवाड, बाबासाहेब जऱ्हाड, प्रदीप जाधव, रशीद चौधरी, रहिम परसुवाले, अयुब परसुवाले, संतोष सांगळे, राम राठोड, राम एखंडे, केदारनाथ एखंडे, अरुण डोळसे, अशोक चव्हाण, बाला मोरे, रामेश्वर वाडेकर, विक्रम कुसंदका, गणेश शिंदे, अभिषेक जोगदंड, प्रदीप जाधव, महादेव जाधव, अशोक ढेंगळे, उत्तम वाघ, सर्जेराव शेवाळे, कमलाकर कळकुंबे, भरत जाधव, किशोर खराडे, अप्पासाहेब उगले, करण लकडे, अंकुश चव्हाण, गिताराम तिडके, निरज मंत्री, परमेश्वर फुले, काकासाहेब जिवरंग, हरिभाऊ कापसे, भगवान शिंदे, प्रकाश शिंदे, जालिंदर जोगदंड, सोपान कावळे, वैजिनाथ कावळे, कडूबा इंदलकर, कांतराव रांजणकर, सखाराम लंके, शेख नजीर आदींसह शिवसेना पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### आंबेडकरी चळवळीचे ...

महेंद्र बनकर, संजय हेरकर, कैलास भिसे, मिलींद शेळके, ॲड. बी.एम. साळवे, बाबासाहेब वानखेडे, गणेश जाधव, शिवलाल घाडगे, पांडुरंग चांदोडे, दादाराव राऊत, शेषराव हिवाळे, कांतीलाल हरिभाऊ बोर्डे, दिपक बोर्डे, प्रकाश खरात, अशोक साबळे, सुदाम राव सदाशिव, राजेश राऊत, रमेश देहेडकर, मधुकर बोबडे, दिनकर घेवंदे, कॉ सगीर भाई, प्रमोद खरात, शांतीलाल बोर्डे, कडुबा शेळके, यशवंत पाईकराव, कडुबा वाकीकर, नंदू जांगडे, डॉ. सुशील सुर्यवंशी, ॲड. बबन मगरे, काशिनाथ मगरे, बाबुराव सतकर, सुनील साळवे, विष्णू पाचफुले, गोपाल भुरेवार, संजय हिवराळे, दत्तानाना आर्दड, बबन रत्नपारखे, सुनील रत्नपारखे, हरेष रत्नपारखे, योगेश रत्नपारखे, ॲड. उमाकांत पैठणे, सुभाष घाडगे, दीपक डोके, ॲड. योगेश घाडगे, ॲड. इंगळे, अशोकराव वाहुळकर, बनसोडे, विजय जाधव, शेख इब्राहिम, अकबर इमानदार, काशिनाथ मगरे, दिलीप रत्नपारखे, रमाकांत खरात, नंदकिशोर जांगडे, नंदकिशोर बाकीलाल, प्रतिक लांडगे, प्रकाश खरात, रोहिदास रत्नपारखे, बालकिशन पैठणे, विनोद गायकवाड, सुधाकर निकाळजे, चंद्रकांत खरात, धनंजय पाईकराव, प्रमोद गायकवाड, यशवंत पाईकराव, मधुकर लोखंडे, पांडुरंग चांदोडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## वाचकांचे मनोगत

# भारतीयांची सुरक्षा धोक्यात ?

केंद्रात भाजप तिर्यांदा सत्तेवर आले आहे.मागील दहा वर्षांत देशांतर्गत आणि देशा बाहेरील कामकाजाचा दांडगा अनुभव आला असेल. पंतप्रधान पदावर नरेंद्र मोदी विराजमान आहेत.मागील दहा वर्षांत देशाच्या सीमारेषेवर सुरक्षा व्यवस्था अधिक शक्तीशाली होणे अभिप्रेत होते.पण तसे नसल्याचे काश्मिर मधील पहलगाम मध्ये पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी हिंदु पर्यटकांना गोळ्या घालून मारले यावरून दिसून येते. आमचे संरक्षण दल ,त्यांचे सल्लागार, संरक्षण मंत्री,गृहमंत्री यांना भारतीय गुप्तहेर यंत्रणेतील वरिष्ठ अधिकार्यांनी माहिती का दिली नाही.पंतप्रधान, गृहमंत्री देशातील जनतेला उपदेश करतात त्यावर विश्वास ठेवून जीवनक्रम सुरू ठेवतात. अशा दुर्दैवी घटनांची मालिका सुरूच राहीली तर विश्वास कोणावर ठेवायचा .पुलवामा हल्ल्यांनंतरही दहशतवाद्यांच्या कुरापती सुरूच आहेत. महाराष्ट्रातील सहा पर्यटक दहशतवाद्यांकडून मारले गेले.काश्मिर मधील गोळीबारात २६ पर्यटक ठार झाले.काय दोष होता त्यांचा ते हिंदु होते म्हणूनच दहशतवाद्यांनी प्रथम पर्यटकांची नावे विचारली नंतर त्यांना गोळ्या घातल्या.बैसरन या ' मिनी स्वित्झर्लंड ' अशी ओळख असलेल्या गवताळ प्रदेशात पर्यटक आनंद घेत असतानाच मंगळवारी दुपारी ३.00 वाजता दहशतवादी हल्ला झाला.काश्मिर मध्ये थोड्याफार प्रमाणात शांतता प्रस्थापित होत होती .पर्यटक वाढत होते. पुढील सहा महिन्यातील १५ हजार विमान तिकीटे रद्द करण्यात आली.तेथील मूळ व्यवसाय असलेल्या पर्यटनाला मोठा धोका निर्माण झाला आहे.भारत सरकारकडून पाकिस्तानला जशास तसे उत्तर का दिले नाही.कोणाची वाट बघत आहेत. भारतीय नागरिकांचे मरण स्वस्त करू नका. भारतीय राजकारणात जेवढी जरब बसवली तेवढी जरब शत्रू राष्ट्रांवर बसवा. महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**
९८६९४७६२०९, mahadeogolvaskargmail.com

युवा आदर्श

## मधमाशी ...

अहो रात्र कार्यरत
मधसंचे मधमाशी
नेतात चोरून मध
टपून बसे अधाशी
आश्वस्ततिकीटाचे
पाडतात तोंडघशी
पितळेपुढे रे फिके
सुवर्ण बावनकशी
अग्रभागी फोटोला
जो करी मखलाशी
नजर आम्हां वरती
बसून राहे पायाशी
साक्षीदार उगा बने
करता ते अय्याशी
कमवी सुवर्ण राशी
दिसला जो उशाशी
हाड होवून राहिलो
जेवण येते घशाशी
इमान असे मिठाशी
म्हणे खावे कशाशी
स्वताचेचंनातेवाईक
कवटाळे का उराशी
फेले जातो शेवटाले
चूक दिसता जराशी
श्रेष्ठीचे विचार बदले
लागे कुणी कानाशी
पुन्हा पुढे येईल संधी
समजूतघाले मनाशी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# शालेय स्पर्धा परीक्षेकरिता मोफत ऑनलाईन नवोदय क्लासचा जाफराबाद पॅटर्न

## जाफराबाद स्पर्धा परीक्षा विचार मंच द्वारा आयोजित मोफत ऑनलाईन क्लासचा शेकडो विद्यार्थी घेताहेत लाभ

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** स्पर्धा परीक्षा विचारमंच अंतर्गत मोफत नवोदय, शिष्यवृत्ती, एन एम एम एस वर्ग अविरतपणे सुरू आहे. सन २०२० मध्ये शाळा बंद होत्या त्यावेळी आदरणीय तत्कालीन गटशिक्षणाधिकारी श्री सतीश सातव यांच्या प्रेरणेतून सुरू झालेला हा मोफत ऑनलाईन नवोदय क्लास आजही अविरतपणे सुरू आहे.

शाळा बंद होत्या शिक्षण बंद होते. अशाच परिस्थितीत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे साधनव्यक्ती नारायण पिंपळे व जिल्हा परिषद शिक्षक पंजाब दांदडे यांनी ऑनलाईन मोबाईल वरुन वर्ग घ्यायचा ठरवले.शाळेच्या ग्रूपवरून पालकांना आवाहन करण्यात आले. पालकांचा ग्रुप तयार करण्यात आला. व नियमित अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. हळू हळू मुले जॉईन होऊ लागले. झूम प वर वर्ग सुरु झाला. काही दिवसानंतर शाळा सुरु झाल्या. मग एक कल्पना डोक्यात आली की इयत्ता पाचवी नवोदय, शिष्यवृत्ती व इयत्ता आठवी शिष्यवृत्ती ,नवोदय एन. एम. एम. एस. याचे क्लास आपण घेतले पाहिजे आणि तेही ऑनलाइन जे विद्यार्थी कुठे बाहेर राहून किंवा कुठे बाहेर जाऊन क्लास करू शकत नाही अशा होतकरू विद्यार्थ्यांकरिता हा आपला ऑनलाईन क्लास सुरू करूया असं ठरलं आणि ऑनलाईन क्लास त्या पद्धतीने सुरू करण्यात आला. पहिल्या वर्षी थोडा प्रतिसाद कमी होता तरीही नवोदयला चार विद्यार्थी पात्र झाले तसेच शिष्यवृत्ती करिता दोन विद्यार्थी पात्र झाले आणि एन एम एम एस करिता साठ विद्यार्थी पात्र झाले.

परत दुसऱ्या वर्षी सुद्धा अशाच प्रकारचा ऑनलाइन वर्ग घेण्यात आला यामध्ये सुद्धा पाच विद्यार्थी नवोदयला पात्र झाले तर जवळपास १३५ विद्यार्थी एन. एम. एम. एस. परीक्षेमध्ये पात्र झाले शिष्यवृत्तीला चार विद्यार्थी पात्र झाले. अशा प्रकारे मागील चार वर्षापासून हा ऑनलाईन नवोदय स्कॉलरशिप, एन एम एम एस वर्ग अविरतपणे सुरू आहे.

या क्लासमध्ये फक्त जाफराबाद तालुक्यातीलच नाही तर जालना जिल्ह्यातील इतर तालुक्यातील विद्यार्थीसुद्धा सहभागी आहेत. तसेच इतर जिल्ह्यातील म्हणजेच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील विद्यार्थी या क्लासला जोडलेले आहेत. त्याचा फायदा सुद्धा त्यांना झालेला आहे. विशेष बाब म्हणजे शाळेच्या व्यतिरिक्त ज्यावेळी विद्यार्थी शाळेच्या व्यतिरिक्त त्याला वेळ मिळतो त्यावेळी हा क्लास घेतल्या जातो म्हणजेच सकाळी पाच वाजून ३० मिनिटांनी वर्ग सुरू होतो व साडे सहा पर्यंत हा वर्ग असतो. त्यानंतर विद्यार्थ्याला त्याच्या शाळा असतात. तसेच संध्याकाळी साडेसात वाजता वर्ग सुरू होतो व साडे आठ वाजता वर्ग संपतो म्हणजे दोन्ही वेळ विद्यार्थ्यांना त्यांच्या सवडीनुसार मिळते व पालकांचा मोबाईल सुद्धा त्यांना त्यावेळेस मिळतो. विशेष बाब म्हणजे रविवार, शनिवार अगदी सणासुदीच्या दिवसांमध्ये सुद्धा क्लासला सुट्टी नसते. तसेच दिवाळीच्या सुट्टीमध्ये दहा ते पंधरा दिवस ऑफलाइन क्लास गोंधनखेडा येथील श्री गौरीशंकर म हादेव संस्थान या ठिकाणी ऑफलाइन वर्ग घेण्यात येतो, त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष चाचण्या घेतल्या जातात व प्रॉब्लेम त्यास ठिकाणी सॉल करून दिल्या जातात असे एकूण ऑनलाइन व ऑफलाईन जवळपास १०० सराव चाचण्या सोडवून घेतल्या जातात. विद्यार्थ्यांकडून एकही रुपयाची फीस घेतल्या जात नाही अगदी मोफत वर्ग हा चालविल्या जातो आणि सुरुवातीपासून ते परीक्षेपर्यंत कोणत्याही प्रकारचा खंड यामध्ये असत नाही. परीक्षेच्या अगोदर आठ दिवसा अगोदर एक सामूहिक तालुकास्तरीय चाचणीचे नियोजन केल्या जाते.त्यामध्ये प्रथम येणाऱ्या दहा विद्यार्थ्यांना पारितोषिक सुद्धा दिली जातात. पारितोषिकाचे नियोजन शिक्षण निरीक्षक डॉ. सतीश सातव हे करतात. सोपान शिंदे, पंजाब दांदडे, पंजाब क्षीरसागर यांच्याकडून चहा, नाश्ता, पाण्याची व्यवस्था विद्यार्थ्यांना केली जाते. मागील चार वर्षांपासून आत्तापर्यंत नवोदय करता ३२ विद्यार्थी पात्र झालेले आहेत सारथी एन. एम.एम. एस. शिष्यवृत्ती करता ७५० विद्यार्थी पात्र आहेत तर एन एम एम एस शिष्यवृत्ती करिता २६७ विद्यार्थी आत्तापर्यंत चार वर्षात पात्र आहे. याही वर्षी शैक्षणिक वर्ष २०२५ २६ या शैक्षणिक वर्षात १ एप्रिल २०२५ पासून परत ऑनलाईन नवोदय शिष्यवृत्ती एन एम एम एस हा वर्ग सुरू करण्यात आलेला आहे एक एप्रिल ते परीक्षा होईपर्यंत हा वर्ग अशाच प्रकारे सुरू असणार आहे. आताही या वर्गामध्ये ३०० विद्यार्थी झूम प्लॅटफॉर्मवर असतात तर काही विद्यार्थी यू ट्यूब ला जॉईन झालेले असतात .याही वर्षी जालना जिल्ह्यातीलच नाही तर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातून सुद्धा विद्यार्थी ऑनलाईन वर्गाला जॉईन आहेत. या धकाधकीच्या जीवनात जे विद्यार्थी कोणत्याही प्रकारचा ऑनलाइन क्लास किंवा ऑफलाइन क्लास लावू शकत नाही जे गरीब विद्यार्थी आहेत जे कोणत्या क्लासची फी भरू शकत नाही अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी हा मोफत ऑनलाईन नवोदय क्लास गत पाच वर्षापासून अविरतपणे सुरू आहे . सर्व इच्छुक पालकांनी आपल्या होतकरू विद्यार्थ्यांना या मोफत ऑनलाईन क्लासचा अवश्य लाभ द्यावा असे आवाहन मोफत क्लास च्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद शाळा सीबीएससी पॅटर्नची जनजागृती रॅली उत्साहात साजरी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तपोवन गोंधन व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साखरे वस्ती यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या जिल्हा परिषद शाळेमध्ये या वर्षीपासून सुरू झालेल्या सीबीएससी पॅटर्न ची जनजागृती रॅली उत्साहात काढण्यात आली यामध्ये जिल्हा परिषद शाळेमध्ये सुरू असलेल्या सर्व उपक्रमांची माहिती व तसेच मोफत दिल्या जाणाऱ्या सर्व योजनांची माहिती गावकऱ्यांना प्रत्यक्ष देण्यात आली. बॅनर आणि पोस्टर गावामध्ये लावण्यात आले .यामध्ये दोन्ही शाळेचे सर्व शिक्षक बांधव भगिनी व गावातील सरपंच उपसरपंच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व तसे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आज सर्व पालकांना व गावातील नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की आपण आपल्या पाल्याचा प्रवेश जिल्हा परिषद शाळेतच घ्यावा .

या कार्यक्रमासाठी तालुकास्तरावरून साधन व्यक्ती श्री नारायण पिंपळे यांनी सहभाग घेऊन गावकऱ्यांना /पालकांना मार्गदर्शन केले. ही रॅली यशस्वी करण्याकरिता तपोवन शाळेचे मुख्याध्यापक श्री तळेकर, नसीम शेख, कैलास चेके, श्रीमती सुलभा गायकवाड, सुखदेव चेके आणि साखरे वस्ती शाळेचे मुख्याध्यापक श्री पंजाब दांदडे व श्रीमती किरण बेबी लहाने यांनी परिश्रम घेतले.




# डबलजीन येथून २० वर्षाचा गतिमंद मुलगा हरवला

**जालना । प्रतिनिधी -** येथील डबलजीन येथून एक २० वर्षीय मुलगा हरवला आहे. हरवलेला मुलगा हा गतिमंद असून करण मिसाळ असं त्याचं नाव आहे.१९ एप्रिल रोजी ही घटना घडली आहे. या प्रकरणी हरवलेल्या मुलाच्या आई देवकी मिसाळ यांच्या फिर्यादीवरून कदीम जालना पोलिसांनी मिसिंग दाखल केली आहे. देवकी मिसाळ या धुणे-भांडी करण्याचं काम करतात.१९ एप्रिल रोजी देवकी मिसाळ या कामासाठी बाहेर गेल्या असताना तो घरीच भावंडांसोबत होता.मात्र देवकी या घरी परतल्यानंतर तो दिसला नाही म्हणून त्यांनी घरातील मुलांकडे करण कुठे गेला म्हणून विचारपूस केली.तेव्हा सकाळी तो तुझ्या पाठीमागेच आला होता म्हणून सांगितलं.यानंतर त्याची शोधाशोध केली गेली पण तो मिळाला नाही.त्यामुळे देवकी मिसाळ यांनी कदीम जालना पोलीस ठाणे गाठून करण हरवल्याची तक्रार दाखल केली.दरम्यान आता करण घरातून जाऊन ७ दिवस उलटले असून पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. करणच्या अंगावर चॉकलेटी रंगाचे शर्ट असून क्रिम कलरची पॅन्ट आहे.रंग गोरा, उंची ५ फ ूट,सडपातळ बांधा,केस काळे, भाषा मराठी असून त्याच्या पायात चप्पल बूट नाही. अशा वर्णनाचा मुलगा कुणाला आढळून आल्यास ९१५८७९४१७० या क्रमांकावर संपर्क साधावा.



# मानव एकता दिवस - निष्काम सेवेचा अनुपम संकल्प

**जालना । प्रतिनिधी -** प्रेम आणि बंधुभावना जागविणारा 'मानव एकता दिवस', संत निरंकारी मिशन द्वारे दरवर्षी २४ एप्रिल रोजी बाबा गुरबचनसिंहजी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ श्रद्धा आणि भक्तिभावनेने परिपूर्ण वातावरणात आयोजित केला जातो. हा दिवस केवळ पुण्यस्मरण करण्याचा प्रसंग नसून मानवता, सौहार्द आणि एकत्वाच्या भावनांचा एक आत्मिक संगम आहे. दरम्यान, संत निरंकारी मंडळातर्फे २४ एप्रिल हा दिव बाबा गुरुचनन संह महाराज यांच्या आठवणी प्रित्यर्थ मानव एकाता दिवस म्हणून साजरा करण्यात आला. दरम्यान, जालना येथील गांधी चमन, रेल्वे स्टेशन रोडवरील निरंकारी मंडळातर्फेही मानव एकता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी परिसरातील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या असिम कृपेने भारतातच नव्हे तर दूरदेशातही महारक्तदान शिबीराचे निंरकारी चॅरिटेबल फाऊंडेशन वतीने आयोजन करण्यात येते. मानव एकता दिवसाच्या या प्रसंगी मिशन कडून देशभर रक्तदानाच्या एका प्रेरक श्रृंखलेचा शुभारंभ होतो. जो नि:स्वार्थ सेवाभावनेच्या सामूहिक जागृतीचे स्वरूप बनून संपूर्ण वर्षभर समाजामध्ये प्रवाहित होत राहते. त्याचबरोबर सत्संग कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रेम, शांती आणि समरसतेचा प्रकाशदेखील जनसामान्यांपर्यत पोहचविला जातो.



हा दिवस या गोष्टीचे परिचायक आहे, की सेवा केवळ एक कार्य नसून निष्काम समर्पण व आत्मिक भावनेचे द्योतक आहे. यावर्षी सुद्धा संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन मार्फत पूर्ण भारतवर्षात सुमारे ५००हून अधिक शाखांमध्ये भव्य यरक्तदान शिबिरांची अखंड श्रृंखला आयोजित करण्यात आली. युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी यांनी सत्यबोधाच्या माध्यमातून समाजाला समाज अंधश्रद्धा व अनिष्ठ प्रथांपासून मुक्त करुन नशमुक्ती, साधे विवाह आणि युवावर्गाला सकारात्मक विचारांशी जोडणे यांसारख्य लोककल्याणकारी अभियांनाची प्रेरक सुरवात केली. त्यांचे पावन मार्गदर्शन पुढे चालवत बाबा हरदेवसिंहजी यांनी रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नको हा अमर संदेश देऊन रक्तदानाला मिशनच्या आध्यात्मिक सेवेचे अभिन्न अंग बनवले. हा संदेश आजदेखील प्रत्येक निरंकारी भक्ताच्या हृदयामध्ये सेवा आणि समर्पणाची प्रेरक ज्योत बनून तेवत आहे. हा दिवस चाचा प्रतापसिंहजी यांच्यासह त्या सर्व समर्पित बलिदानी संतांच्या पुण्य स्मृतिचे प्रतीक आहे, ज्यांनी मानव एकता, निःस्वार्थ सेवा आणि आध्यात्मिक जागृतीच्या मार्गावर चालत असताना आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. मानव एकता दिवस त्याच संतांचा दृढविश्वास व दृढसंकल्पाची प्रेरणा जीवंत करतो. हे महाअभियान केवळ रक्तदान नसून सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांचा करुणा, सेवा आणि एकत्वाचा संदेश जीवनात उतरविण्याचे सजीव माध्यम आहे जे आम्हाला शिकवते, की मानवता हाच सर्वोच्च धर्म होय. याच प्रेरणेने युक्त संत निरंकारी मिशन, सेवा आणि समर्पणाच्या पथावर निरंतर मानवतेचा मार्ग प्रशस्त करत आहे.

# निबंध स्पर्धेमध्ये यश!

**जालना । प्रतिनिधी -** हिंदू समाज संस्था संचलित कै. बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयाच्या कु. अदिती नीरज राय( वर्ग आठवा ) अनन्या वाघमारे( वर्ग आठवा) अश्विनी मुळे( वर्ग आठवा) संध्या पांगारकर( वर्ग आठवा) यांनी पंचायत राज दिनानिमित्त आपले गाव, सुंदर, स्वच्छ आणि आदर्श कसे बनवता येईल? तसेच माझ्या स्वप्नातील गाव या विषयावर निबंध स्पर्धेमध्ये मध्यम गटामध्ये उत्तेजनार्थ बक्षीस मिळवल्याबद्दल भोकरदन मतदारसंघाचे आमदार संतोष दानवे पाटील, महिला भाजप आघाडीचे अध्यक्ष शुभांगी देशपांडे , संध्या देठे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. त्यांना उपक्रमशील शिक्षक संदीप इंगोले यांनी मार्गदर्शन केले.या यशाबद्दल हिंदू समाज संस्थेचे अध्यक्ष ड.संजीव देशपांडे सचिव चंद्रशेखर वाघमारे, संचालक कुमार देशपांडे,नितीन कोळेश्वर, जुगल किशोर भक्कड सर्व संचालक मंडळ , शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती. मीनाक्षी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.




# सेवाभारती रुग्ण केंद्रास सहाय्य



**जालना । प्रतिनिधी -** सेवा भारती देवगिरी प्रांत ही संस्था आरोग्य, शिक्षण, आपत्ती विमोचन, स्वावलंबन या क्षेत्रात सेवा कार्य करते. या अंतर्गत जालना शहरात दोन रुग्णोपयोगी केंद्र चालतात. या केंद्राच्या माध्यमातून अपघात झालेल्या, अर्धांग वायु झालेल्या रुग्णांना व्हील चेअर, फाउलर बेड, ऑक्सिजन मशीन सेवा भावनेतून पुरवल्या जातात. या रुग्ण केंद्राकरिता सामाजिक जाणीवेतून प्रभाकरराव भाले यांनी त्याच्या पत्नी कै. कालिंदी भाले यांच्या स्मृती प्रित्यर्थ एक ऑक्सिजन मशीन देणगी स्वरुपात दिली. याचा रुग्णसेवेसाठी फायदा होणार आहे. यावेळी सेवा भारतीचे सुनील जोशी, संदीप देशपांडे, डॉ.सुभाष भाले, राजेंद्र बावकर, चैतन्य बावकर, रवींद्र व्यास आदी उपस्थित होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.